आजचे पंचांग

मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, कृष्णपक्ष, द्वादशी रात्री १२-१३ पर्यंत, दिवस नक्षत्र – शततारा दुपारी ४-०६ पर्यंत नंतर पूर्वाभाद्रपदा
चंद्र रास - कुंभ, सूर्य रास - मीन सकाळी ९-३२ पर्यंत नंतर मेष, गुरु रास - मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...






आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. १४ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - १९९ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### कच्च्या तेलाच्या वायद्यांमध्ये वाढ

**नवी दिल्ली :** इराणसोबतच्या वाटाघाटी अयशस्वी झाल्यानंतर अमेरिकेने होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नाकेबंदी जाहीर केल्यामुळे निर्माण झालेल्या मजबूत जागतिक ट्रेंडच्या पार्श्वभूमीवर, सोमवारी वायदे बाजारात कच्च्या तेलाच्या किमती जवळपास ७ टक्क्यांनी वाढून प्रति बॅरल ९,७५९ रुपयांवर पोहोचल्या. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर ८,७६७ लॉट्सच्या उलाढालीत, एप्रिल डिलिव्हरीच्या कच्च्या तेलाच्या दरात ६०६ रुपयांची, म्हणजेच ७ टक्क्यांची वाढ झाली.

### गतीशक्ती अंतर्गत विकासाला गती

**चंदीगड :** हरियाणाने पीएम गती शक्ती आराखड्याअंतर्गत आपल्या पायाभूत सुविधांच्या विकासाला लक्षणीय गती दिली असून, ४२ मोठे प्रकल्प आधीच आखले गेले आहेत आणि आणखी ४० प्रकल्प विचाराधीन आहेत. मुख्य सचिव अनुराग रस्तोगी यांनी येथे प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आणि अंमलबजावणीला गती देण्यासाठी एका सविस्तर आढावा बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवले. या बैठकीत एकात्मिक नियोजन बळकट करणे, आंतर-विभागीय समन्वय सुधारणे आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे यावर लक्ष केंद्रित करण्यात आले.

### कर्नाटक राज्यात खासगी बस पलटली

**शिवमोग्गा (कर्नाटक) :** जिल्ह्यातील शिकारीपूर शहरात एक खासगी बस उलटल्याने १७ प्रवासी जखमी झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली. जखमींपैकी १५ जणांना किरकोळ दुखापत झाली असून, इतर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. सर्व जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती धोक्याबाहेर आहे.

सर्वोच्च न्यायालयाची आयोगासह केंद्र, राज्यांना नोटीस

## डिजिटल निवडणुकांच्या दिशेने ठोस पावले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता वाढवण्यासाठी आणि बोगस मतदानाला पूर्णपणे आळा घालण्यासाठी मतदारांची बायोमेट्रिक ओळख आणि फेस रिकग्निशन प्रणाली लागू करण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेची सर्वोच्च न्यायालयाने दखल घेतली आहे. भाजप नेते आणि वकील अश्विनी उपाध्याय यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने निवडणूक आयोग, केंद्र सरकार तसेच सर्व राज्य सरकारांना नोटीस बजावली आहे.



याचिकेत आधार-आधारित बायोमेट्रिक पडताळणी मतदानासाठी अनिवार्य करावी, तसेच मतदान केंद्रावर मतदाराचा चेहरा ओळखून त्याची ओळख पटवण्याची तांत्रिक व्यवस्था लागू करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. या उपाययोजनांमुळे दुबार मतदान, बनावट ओळख आणि मृत मतदारांच्या नावावर होणारे मतदान रोखता येईल, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला आहे. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी निरीक्षण नोंदवताना सांगितले की, अशी प्रणाली लागू करण्यासाठी विद्यमान निवडणूक नियमांमध्ये मोठे बदल करावे लागतील. तसेच यासाठी मोठा आर्थिक खर्चही अपेक्षित आहे. मात्र निवडणूक आयोगाकडे अशा सुधारणा राबवण्याचे अधिकार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला की, निवडणूक आयोग स्वतंत्र संस्था असली तरी राज्य सरकारांचे सहकार्य अत्यावश्यक आहे. त्यामुळे सर्व संबंधित घटकांना नोटीस बजावणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, आगामी काही राज्यांतील विधानसभा निवडणुकांवर या प्रस्तावाचा थेट परिणाम होणार नाही. मात्र भविष्यातील लोकसभा किंवा पुढील निवडणुकांसाठी अशा तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक ठरेल का, यावर सखोल विचार होणे गरजेचे आहे.

न्यायालयाने निवडणूक आयोग, केंद्र सरकार तसेच अर्थ मंत्रालयाकडून या प्रस्तावाच्या व्यवहार्यता, तांत्रिक क्षमता आणि आर्थिक परिणामांबाबत सविस्तर उत्तर मागवले आहे. या प्रणालीसाठी राज्यांचे सहकार्य आणि अर्थसंकल्पीय मंजुरी आवश्यक ठरणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## सावधान! महाराष्ट्रात उष्णतेची लाट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** राज्यात उन्हाचा कडाका दिवसेंदिवस तीव्र होत असून विदर्भ आणि मराठवाड्यात उष्णतेची लाट जाणवू लागली आहे. चंद्रपूर, ब्रह्मपुरी, अकोला आणि वर्धा येथे तापमान ४२ ते ४४ अंश सेल्सिअसदरम्यान राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

दरम्यान, नागरिकांनी दुपारच्या वेळेत बाहेर पडणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पुण्यातही तापमानाचा पारा चढत असून ४२ अंश सेल्सिअसपर्यंत नोंद होण्याची शक्यता आहे. लोहगाव आणि कोरेगाव पार्क परिसरातही तापमान उच्च पातळीवर जाण्याचा अंदाज आहे. ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांत किमान तापमान २४ अंश, तर कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअसपर्यंत राहण्याचा अंदाज आहे. या भागात दमट उष्णतेमुळे दिवसभर घामाच्या धारा लागण्याची शक्यता आहे. पुढील काही दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.लातूर, धाराशिव आणि नांदेड जिल्ह्यांतही कोरड्या हवामानामुळे उष्णतेची तीव्रता वाढली आहे. एप्रिल महिन्याच्या मध्यावरच तापमान ४२ अंशांच्या पुढे जात असल्याने मे महिन्यात उष्णतेचा अधिक तीव्र फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हवामान विभागाच्या इशाऱ्यानुसार, चंद्रपूर, अकोला, ब्रह्मपुरी, नागपूर आणि वर्धा या भागांना उष्णतेचा सर्वाधिक फटका बसू शकतो.

## आशा भोसले संगीत अकादमी उभारण्यास मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत एकूण आठ महत्त्वपूर्ण निर्णयांना मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत सांस्कृतिक क्षेत्राशी संबंधित महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून, ज्येष्ठ गायिका पद्मविभूषण आशा भोसले यांच्या स्मृती जपण्यासाठी 'आशा भोसले संगीत अकादमी' उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मंत्रिमंडळ बैठकीत मंत्री प्रताप सरनाईक यांनी आशा भोसले यांच्या नावाने स्मारक उभारण्याचा प्रस्ताव मांडला. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी आशाताईंनी यापूर्वी व्यक्त केलेल्या इच्छेनुसारच पुढील कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला. यानुसार मुंबईतील वांद्रे–अंधेरी परिसरात 'आशा भोसले संगीत अकादमी' उभारली जाणार असून, त्यासाठी योग्य जागा निश्चित करण्याचे आदेश म्हाडाला देण्यात आले आहेत. आशा भोसले यांनी यापूर्वी या परिसरात अकादमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यामुळे आशाताईंनी व्यक्त केलेली इच्छा त्यांच्या निधनानंतर पूर्ण होत असल्याचे दिसून येत आहे.

या निर्णयामुळे त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासोबतच संगीत क्षेत्राला नवे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. नवोदित कलाकारांच्या प्रशिक्षणासाठी ही अकादमी महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

साश्रू नयनांनी अंत्यदर्शन; अखेरचा निरोप देण्यासाठी दिग्गजांची उपस्थिती

## सूरसम्राज्ञी आशा भोसले अनंतात विलीन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** संपूर्ण देशाने साश्रू नयनांनी ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना अखेरचा निरोप दिला. दशकानुदशके भारतीयांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या या दिग्गज गायिकेच्या पार्थिवावर आज, १३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी चार वाजता शिवाजी पार्क येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. सहा दशकांहून अधिक काळ रसिकांना मंत्रमुग्ध करणारा त्यांचा आवाज अनंतात विलीन झाला असून त्यांच्या निधनाने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला आहे.



आशा भोसले यांनी १२ एप्रिल रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. सोमवारी सकाळी अकरा वाजता लोअर परळ येथील त्यांच्या निवासस्थानी पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी चित्रपटसृष्टी, राजकारण आणि विविध क्षेत्रांतील दिग्गजांनी उपस्थिती लावली. अभिनेत्री तब्बू, आशा पारेख, अभिनेता रितेश देशमुख, गायक सुदेश भोसले, राकेश रोशन, नीना गुप्ता, मंगलप्रभात लोढा, भय्याजी जोशी, सुप्रिया सुळे, आशिष शेलार, राज्यपाल जिष्णू देव शर्मा, उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे तसेच विश्वास नांगरे-पाटील यांनी अंत्यदर्शन घेतले.

लोअर परळ येथील निवासस्थानी मुंबई पोलिसांकडून त्यांना मानवंदना देण्यात आली. अंत्यसंस्कारावेळी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि इतर मान्यवर उपस्थित होते. मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांचे निधन झाले होते. भारतरत्न लता मंगेशकर यांच्या लहान बहिणी असलेल्या आशा भोसले यांना हिंदी चित्रपटसृष्टीतील बहुआयामी गायिका म्हणून ओळखले जात होते. त्यांनी हिंदीसह मराठी, बंगाली, गुजराती, तमिळ, तेलुगू अशा विविध भाषांमध्ये हजारो गाणी गायली. आर. डी. बर्मन, ओ. पी. नैय्यर, सचिन देव बर्मन, लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांसारख्या दिग्गज संगीतकारांसोबत त्यांनी अनेक अजरामर गाणी दिली. आपल्या कारकिर्दीत त्यांनी प्रचंड संघर्ष करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. सुरुवातीला नाकारलेली गाणी स्वीकारून त्याच गाण्यांना त्यांनी लोकप्रियतेच्या शिखरावर नेले. चित्रपटसंगीत, गझल, पॉप आणि शास्त्रीय संगीत अशा विविध प्रकारांत त्यांनी आपली छाप उमटवली.

अंत्यसंस्कारावेळी गायक सुदेश भोसले, शान आणि अनुप जलोटा यांनी आपल्या गायनातून आशाताईंना श्रद्धांजली वाहिली. सुदेश भोसले यांनी "यहाँ कल क्या हो किसने जाना" हे गाणे सादर करत भावना व्यक्त केल्या. सुरांच्या माध्यमातून व्यक्त झालेल्या या श्रद्धांजलीने उपस्थितांचे डोळे पाणावले.

देशासह महाराष्ट्रात कमी पावसाची शक्यता व्यक्त

## मान्सूनचा पहिला अंदाज चिंता वाढवणारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशातील शेतकऱ्यांची चिंता वाढवणारी माहिती समोर आली असून, भारतीय हवामान विभागाने नैऋत्य मान्सून २०२६ चा पहिला अधिकृत अंदाज जाहीर केला आहे. यावर्षी देशात सरासरीच्या ९२ टक्के पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला असून, तो सामान्यपेक्षा कमी मानला जातो. हवामान विभागाच्या निकषांनुसार, ९० ते ९५ टक्के पर्जन्यमान असताना तो "सामान्यपेक्षा कमी" या श्रेणीत मोडतो. यामुळे कृषी क्षेत्रावर



परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्रासाठीही चित्र फारसे दिलासादायक नाही. राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भ या सर्व भागांत सरासरीच्या ९० ते ९५ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांची चिंता वाढण्याची शक्यता आहे. हवामान विभागाचे महासंचालक डॉ. एम. मोहापात्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, जून, जुलै आणि ऑगस्ट या महिन्यांत पावसाची स्थिती तुलनेने सामान्य राहण्याची शक्यता आहे. मात्र जुलै ते सप्टेंबरदरम्यान एल निनोची स्थिती निर्माण होण्याची शक्यता असून, त्याचा काही परिणाम होऊ शकतो. तथापि, भारतीय समुद्रातील अनुकूल स्थितीमुळे एल निनोचा प्रतिकूल परिणाम काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, हवामान विभागाने पर्जन्यमानाच्या पाच श्रेणी निश्चित केल्या आहेत. त्यानुसार, ९० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस "अपुरा", ९० ते ९५ टक्के "सामान्यपेक्षा कमी", ९६ ते १०४ टक्के "सामान्य", १०५ ते ११० टक्के "सामान्यपेक्षा जास्त" आणि ११० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस "अतिवृष्टी" म्हणून गणला जातो.

### पाकमधील जनतेचा अन्नासाठी संघर्ष

**मुझफ्फरनगर (उत्तर प्रदेश) :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ सोमवारी म्हणाले की, पाकिस्तानातील लोक अन्नासाठी संघर्ष करत आहेत आणि शेजारच्या देशाला उपासमारीने मरावे लागेल. ९५१ कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या ४२३ प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करण्यासाठी मुझफ्फरनगरमध्ये मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आले होते. त्यावेळी ते बोलत होते. आज आम्ही (भारतात) जो सुखद आणि सुरक्षित अनुभव घेत आहोत, त्याबद्दल मला तुम्हाला विचारायचे आहे, पाकिस्तानातील कोणाला असा सुखद अनुभव घेता येतो का? त्यांना तो कधी घेता येईल का? असे ते म्हणाले.

## ६८ लाख लाडक्या बहिणी अपात्र

महाराष्ट्र सरकारची १२,२४० कोटींची बचत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारच्या लाडकी बहीण योजनेत मोठी छाटणी करण्यात आली असून, तब्बल ६८ लाख महिलांना अपात्र घोषित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे राज्य सरकारला दरवर्षी सुमारे १२,२४० कोटी रुपयांची बचत होणार आहे. परिणामी, योजनेवरील वार्षिक खर्च ४३,७४० कोटी रुपयांवरून कमी होऊन ३१,५०० कोटी रुपयांपर्यंत आला आहे.

सरकारने या योजनेसाठी ई-केवायसीची अंतिम मुदत ३० एप्रिलपर्यंत वाढवली आहे.



यापूर्वी ही मुदत ३१ मार्चपर्यंत होती. महिला व बालविकास विभागातील अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, मोठ्या प्रमाणात अपात्र लाभार्थी वगळल्यानंतर आता इतर विभागांकडून निधी वळवण्याची गरज भासणार नाही.

एकनाथ शिंदे सरकारने जुलै २०२४ मध्ये ही योजना सुरू केली होती. सुरुवातीला सुमारे २ कोटी ४७ लाख महिला लाभार्थी होत्या. मात्र ३१ मार्च २०२६ पर्यंत केवळ १ कोटी ७५ लाख महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली, तर उर्वरित ६८ लाख महिला अपात्र ठरल्या. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १,५०० रुपये दिले जातात. अपात्र महिलांनीही लाभ घेतल्याच्या तक्रारींनंतर १८ सप्टेंबर २०२५ रोजी सरकारने ई-केवायसी अनिवार्य केले होते. अधिकाऱ्यांच्या मते, गेल्या सुमारे २० महिन्यांत अपात्र महिलांच्या खात्यात २० हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम जमा झाली होती. आता या महिलांना वगळल्यानंतर राज्याच्या आर्थिक ताणात मोठी घट होणार आहे.

पिंपरी-चिंचवडमधील १५ अनधिकृत शाळांची यादी जाहीर

## अनधिकृत शाळांवर कठोर कारवाईचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील १५ शाळा अनधिकृत असल्याचे उघड झाल्यानंतर महानगरपालिका शिक्षण विभागाने पालकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. संबंधित शाळांमध्ये चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये, अशी स्पष्ट सूचना देत विभागाने अधिकृत नोटीस काढून अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली आहे.



महापालिकेच्या माहितीनुसार, या शाळा मागील काही वर्षांपासून सुरू होत्या. मात्र आवश्यक परवानग्या, मान्यता आणि शैक्षणिक निकष पूर्ण न केल्यामुळे त्या अनधिकृत असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

शिक्षण विभागाने पालकांना आवाहन केले आहे की, प्रवेश घेण्यापूर्वी संबंधित शाळेची अधिकृत मान्यता तपासून घ्यावी. अन्यथा भविष्यात शैक्षणिक अडचणींचा सामना करावा लागू शकतो. दरम्यान, अनधिकृत शाळांविरोधात पुढील कठोर कारवाई केली जाणार असल्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत खासगी प्राथमिक शाळांविरोधात मोठी कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला असून, या विषयावर सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या महाराष्ट्र लोकधारा न्यूजचे संपादक महावीर जाधव यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याची चर्चा आहे. सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात काही खाजगी प्राथमिक शाळा शासनाची परवानगी न घेता सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. यापूर्वीही संबंधित शाळांना नोटिसा देण्यात आल्या होत्या; मात्र त्या सुरूच ठेवण्यात आल्याचे समोर आले आहे. या प्रकरणामुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण असून, प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

अनधिकृत शाळांची यादी पुढीलप्रमाणे आहे : ब्लूमिंग बर्ड्स, ताथवडे; लिटल स्टार इंग्लिश मिडियम, चिंचवडेनगर; माउंट एव्हरेस्ट इंग्लिश स्कूल, कासारवाडी; डी.एम.के. इंटरनॅशनल स्कूल, कासारवाडी; माने इंग्लिश मिडियम स्कूल, काळेवाडी; नर्चर इंटरनॅशनल स्कूल, काळेवाडी/चिखली-होळी परिसर; माईंडवर्ल्ड इंटरनॅशनल स्कूल, चिखली-होळी परिसर; हेम्स इंटरनॅशनल स्कूल, वाकड; कॅटलिस्ट इंटरनॅशनल स्कूल, चिखली-होळी फाटा; गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल, मोशी.

## युद्धाच्या झळा स्वयंपाकघरात खाद्य तेलांवर दरवाढीचा दबाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय बाजारातील अस्थिरता आणि सुरू असलेल्या भू-राजकीय संघर्षांचा थेट परिणाम आता भारतीय स्वयंपाकघरांपर्यंत पोहोचताना दिसत आहे. देशातील खाद्यतेलाच्या आयातीत मार्च महिन्यात मोठी वाढ नोंदवली गेली असून, वार्षिक आधारावर १२ टक्क्यांची उसळी दिसून आली.

सॉल्व्हेंट एक्स्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ इंडियाने (सी) जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, मार्च महिन्यात एकूण ११.७३ लाख टन खाद्यतेलाची आयात करण्यात आली. गेल्या वर्षी याच कालावधीत ही आयात १०.४५ लाख टन इतकी होती. कच्च्या पाम तेलाच्या आयातीत मोठी वाढ झाली आहे. मार्च २०२५ मधील ३.४३ लाख टनांच्या तुलनेत यंदा ६.७३ लाख टन कच्च्या पाम तेलाची आयात झाली आहे. फेब्रुवारीच्या तुलनेत मार्च महिन्यात आयातीत सुमारे १० टक्क्यांची घटही नोंदवली गेली आहे. फेब्रुवारीमध्ये १२.९२ लाख टन खाद्यतेलाची आयात झाली होती. जागतिक बाजारातील वाढते दर, रुपयाचे घसरते मूल्य आणि देशांतर्गत मोहरीच्या पिकाची उपलब्धता यामुळे ही घसरण झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

वनस्पती तेल आयातीचा विचार करता मार्च महिन्यात ११ टक्क्यांची वाढ होऊन ती ११.८६ लाख टनांवर पोहोचली आहे. चालू विपणन वर्षात (नोव्हेंबर २०२५ ते मार्च २०२६) आतापर्यंत एकूण आयात ८ टक्क्यांनी वाढून ६५.७२ लाख टनांवर गेली आहे.

## संपादकीय

# आकड्यांचा खेळ की लोकशाहीचा संकेत?



**मतदारयादी आकुंचन पावत असताना मतदानाचा टक्का वाढतो आहे. वरवर पाहता ही लोकशाहीसाठी चांगली बातमी वाटते. पण या विसंगतीमागील गणित आणि राजकारण समजून घेतले, तर चित्र अधिक गुंतागुंतीचे दिसते. प्रश्न आकड्यांचा नाही; विश्वासाचा आहे.**

लोकशाहीत आकडे महत्त्वाचे असतात. पण तेच आकडे कधी कधी दिशाभूलही करतात. अलीकडील निवडणुकांत दिसणारे चित्र असेच आहे. मतदारयादीतील नावे कमी होत आहेत, आणि मतदानाचे प्रमाण वाढत आहे. हे ऐकायला आशादायी वाटते. पण गाभा वेगळा आहे. मतदारयादी शुद्ध करण्याची प्रक्रिया आवश्यक आहे. मृत, स्थलांतरित किंवा अपात्र नावे वगळलीच पाहिजेत. यादी अचूक असणे ही निवडणूक प्रक्रियेची प्राथमिक अट आहे. पण प्रश्न शुद्धीकरणाचा नाही; त्याच्या मर्यादांचा आहे. किती नावे वगळली जातात, कोणती वगळली जातात, आणि ती कशी वगळली जातात याचे उत्तर स्पष्ट असावे लागते. कारण मतदानाचा टक्का हा स्वतंत्र आकडा नसतो; तो गुणोत्तर असतो. हरकतीशिवाय मतदारांची संख्या कमी झाली, तर त्याच मतदानातूनही टक्का वाढतो. म्हणजेच, वाढलेले प्रमाण नेहमीच वाढलेल्या सहभागाचे द्योतक असते असे नाही. टक्केवारी वाढते; सहभाग वाढतोच असे नाही. हीच या संपूर्ण प्रश्नाची मध्यवर्ती विसंगती आहे. एका बाजूला वाढलेले मतदान, आणि दुसऱ्या बाजूला कमी झालेली नोंदणी. दोन्ही गोष्टी एकत्र घडतात, तेव्हा त्याचा अर्थ केवळ उत्साह नसतो; तो गणिताचा परिणामही असतो. पण हा केवळ गणिताचा प्रश्न नाही. तो प्रक्रियेवरच्या विश्वासाचा प्रश्न आहे. मतदारयादीतून नावे वगळली जातात, तेव्हा प्रत्येक वगळलेले नाव हा एक मतदार असतो. एक हक्क असतो. तो गेला, की केवळ आकडा कमी होत नाही; प्रतिनिधित्व कमी होते. यातून संशय निर्माण होतो. शुद्धीकरणाच्या नावाखाली वगळणे होते आहे का? प्रक्रिया पारदर्शक आहे का? अपीलची संधी पुरेशी आहे का? हे प्रश्न विचारणे आवश्यक आहे. कारण लोकशाहीत शंका निर्माण झाली, की विश्वास ढासळतो. मतदानाचे वाढते प्रमाणही स्वतंत्रपणे पाहता येत नाही. त्यामागे अनेक घटक असतात. राजकीय ध्रुवीकरण, स्थानिक मुद्दे, प्रचाराची तीव्रता हे सर्व मतदान वाढवतात. त्यामुळे टक्केवारी वाढली, की लोकशाही मजबूत झाली, असा सरळ निष्कर्ष काढणे धोकादायक ठरते. यात आणखी एक पैलू आहे. मतदारयादीतील कपात आणि मतदानातील वाढ यांचा राजकीय परिणाम होतो. कोण मतदान करत आहे, आणि कोण राहून जात आहे हेच शेवटी निकाल ठरवते. त्यामुळे ही प्रक्रिया केवळ तांत्रिक राहत नाही; ती राजकीय ठरते. याच ठिकाणी लोकशाहीची खरी कसोटी आहे. निवडणूक ही केवळ मतदानाची प्रक्रिया नाही; ती विश्वासाची प्रक्रिया आहे. मतदाराला खात्री हवी असते की त्याचे नाव यादीत आहे, त्याचा मताधिकार सुरक्षित आहे, आणि त्याचा आवाज ऐकला जाईल. आकडे वाढले, की समाधान वाटते. पण त्या आकड्यांच्या पायावर विश्वास नसेल, तर ते समाधान खोटे ठरते. लोकशाहीचे आरोग्य टक्केवारीत मोजता येत नाही; ते समावेशकतेत मोजावे लागते. यासाठी पारदर्शकता अपरिहार्य आहे. मतदारयादीतील बदलांची स्पष्ट माहिती असावी. वगळलेल्या नावांसाठी सोपी आणि प्रभावी पुनर्नोंदणी प्रक्रिया असावी. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या प्रक्रियेवर कोणताही राजकीय संशय राहू नये. याशिवाय, तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे प्रक्रियेची गती वाढली आहे, पण त्याचवेळी त्रुटींची शक्यताही वाढली आहे. डिजिटल नोंदींमधील चुका, डेटा समक्रमणातील अडचणी, आणि पडताळणीतील त्रुटी यामुळे पात्र मतदारही बाहेर राहण्याची शक्यता निर्माण होते. वेग आणि अचूकता यांचा समतोल साधला नाही, तर तंत्रज्ञानही समस्येचा भाग बनते. शेवटी, प्रश्न असा नाही की मतदान वाढले का. प्रश्न असा आहे की कोण मतदान करत आहे, आणि कोण वंचित राहतो आहे. कारण लोकशाहीत केवळ टक्केवारी महत्त्वाची नसते; प्रत्येक मतदार महत्त्वाचा असतो. आकडे वाढले, तरी विश्वास कमी झाला, तर लोकशाही मजबूत होत नाही; ती उघडी पडते. या सगळ्यातून एक साधा पण मूलभूत निष्कर्ष समोर येतो. लोकशाहीचे मूल्य आकड्यांत नसते; ते सहभागात असते. मतदारयादीतून एकही पात्र नाव वगळले गेले, तरी ती केवळ चूक राहत नाही. ती संपूर्ण प्रक्रियेवरील विश्वासाला तडा देणारी घटना ठरते.

# हॉर्मुझचा धडा: ब्रिक्सचा आवाज की प्रतिध्वनी?

**» हॉर्मुझ सामुद्रधुनीतील तणावाने जागतिक ऊर्जा व्यवस्थेची नाजूकता पुन्हा उघड केली. पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे 'ग्लोबल साउथ'च्या एकतेच्या दाव्यांतील पोकळी स्पष्ट झाली. ब्रिक्ससारखे मंच प्रभावी ठरतात की केवळ घोषणांमध्येच अडकतात, हा मूलभूत प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.**




जागतिक अर्थकारणाचा नाडीबिंदू तेल आहे, आणि त्या नाडीवरची पकड हॉर्मुझ सामुद्रधुनीत आहे. हा अरुंद समुद्री मार्ग अडखळला, की जगाचा श्वास अडतो. किंमती उसळतात, बाजार घाबरतात आणि सत्तेची खरी समीकरणे उघडी पडतात. अशा वेळी केवळ पुरवठ्याचा प्रश्न राहत नाही. नेतृत्वाचा प्रश्न उभा राहतो. याच क्षणी ब्रिक्ससारख्या गटांची परीक्षा होते. 'ग्लोबल साउथ'चा आवाज बनण्याची महत्त्वाकांक्षा मिरवणाऱ्या या मंचाकडून अपेक्षा असते. स्पष्ट भूमिका, समन्वित कृती आणि संकटात दिशा. पण वास्तव सरळ आहे. आवाज आहे; एकसंधता नाही.

हॉर्मुझच्या पार्श्वभूमीवर ब्रिक्सकडून कोणतीही ठोस, एकत्रित भूमिका समोर आली नाही. प्रत्येक देश आपापल्या गणितात व्यस्त होता. भारताला ऊर्जा सुरक्षेची चिंता. चीनला पुरवठा साखळीचे गणित. रशियाला किमतींचा विचार. इतर देशांना त्यांच्या मर्यादा. एकत्रित धोरण नव्हते. हेच स्पष्ट होते. यात आश्चर्य नाही. कारण ब्रिक्स हा संघ नाही. तो स्वार्थांचा मेळा आहे. राजकीय व्यवस्था भिन्न. आर्थिक हितसंबंध परस्परविरोधी. परराष्ट्र धोरण स्वतंत्र. या वास्तवात 'एक मंच, एक भूमिका' ही अपेक्षा आकर्षक असली, तरी अवास्तवच ठरते.

हॉर्मुझने आणखी एक भ्रम फोडला. 'ग्लोबल साउथ' ही कल्पना भावनिक आहे; संस्थात्मक नाही. समान समस्या असणे म्हणजे समान उपाय असणे नव्हे. सामूहिक आवाज हवा, तर सामूहिक जोखीम स्वीकारावी लागते. ती तयारी येथे दिसत नाही. म्हणूनच, संकटाच्या वेळी ब्रिक्स देश स्वतंत्रपणे हालचाल करतात. गरज पडली, की ते पाश्चिमात्य शक्तींशी संवाद साधतात. स्वतःचे हित जपतात. सामूहिकतेला दुय्यम मानतात. हे वास्तव आहे. आणि तेच निर्णायक ठरते. यातून एक ठळक विरोधाभास समोर येतो. ब्रिक्स स्वतःला पर्याय म्हणवतो; पण संकटात पर्याय ठरत नाही. तो उपस्थित असतो; पण परिणामकारक नसतो. उपस्थिती आहे. परिणाम नाही.

ऊर्जा सुरक्षेसारख्या संवेदनशील क्षेत्रात ही मर्यादा अधिक उघडी पडते. येथे विलंब महागात पडतो. अस्पष्टता धोकादायक ठरते. अशा वेळी समन्वित निर्णय अपेक्षित असतात. पण जेथे प्रत्येक जण स्वतंत्रपणे खेळतो, तेथे सामूहिक रणनीती घडत नाही. याशिवाय, ब्रिक्सचा प्रभाव निवेदनांपुरता मर्यादित राहतो. शब्द मोठे असतात; कृती कमी. 'ग्लोबल साउथ'चा आवाज वाढतो; पण तो एकत्र नसतो. आणि जो आवाज एकत्र नसतो, तो प्रतिध्वनी निर्माण करतो. निर्णय नाही.

यात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे विश्वासार्हतेचा. आंतरराष्ट्रीय मंचांवर केवळ उपस्थित राहणे पुरेसे नसते; सातत्यपूर्ण आणि अंदाज करता येईल अशी भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. ब्रिक्स देशांकडून अशी सुसंगतता अपेक्षित असते. पण जेव्हा प्रत्येक निर्णय वेगळ्या दिशेने जातो, तेव्हा त्या मंचावरचा विश्वास कमी होतो. विश्वास कमी झाला, की प्रभावही कमी होतो. आणि प्रभाव नसलेला मंच कितीही मोठा असला, तरी तो केवळ प्रतीकात्मक राहतो.

भारतासाठी यात वेगळीच कसोटी आहे. एका बाजूला ब्रिक्समधील सहभाग. दुसरीकडे स्वतंत्र धोरणात्मक स्वायत्तता. या दोन टोकांमध्ये संतुलन साधताना केवळ उपस्थिती पुरेशी नाही. नेतृत्व दाखवावे लागते. अन्यथा, भारतही या प्रतिध्वनीचा भाग ठरेल. याच संदर्भात आणखी एक वास्तव लक्षात घ्यावे लागते. जागतिक व्यवस्थेत प्रभाव हा घोषणांमधून निर्माण होत नाही. तो संकटातील कृतीतून घडतो.

निर्णायक क्षणी भूमिका स्पष्ट दिसली, की विश्वास निर्माण होतो. अन्यथा, कितीही मोठे व्यासपीठ असले, तरी ते केवळ चर्चेचे ठिकाण ठरते. प्रश्न ब्रिक्स अस्तित्वात आहे का, हा नाही. प्रश्न असा आहे की तो प्रभाव टाकतो का. कारण जागतिक राजकारणात संख्या नव्हे, तर परिणाम महत्त्वाचा असतो. हॉर्मुझने हा धडा पुन्हा दिला. भ्रम मोठा आहे. वास्तव अधिक कठोर.

# पिंपरी-चिंचवडमध्ये आज भीमजल्लोष

## सांगवी-रहाटणीत 'नो व्हेईकल झोन', वाहतुकीत मोठे बदल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या उत्साहात 'भीमजल्लोष' साजरा होणार असून, सांगवी आणि रहाटणी परिसरात लाखो अनुयायांची गर्दी होण्याची शक्यता आहे. संभाव्य गर्दी आणि मिरवणुका लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी व्यापक वाहतूक बदल जाहीर केले आहेत.

सांगवी-रहाटणी भागातील प्रमुख मार्गांवर मोठ्या प्रमाणात मिरवणुका निघणार असल्याने रहाटणी फाटा ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक हा पट्टा अत्यंत संवेदनशील घोषित करण्यात आला आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी या परिसरातील काही रस्ते तात्पुरते 'नो व्हेईकल झोन' करण्यात आले आहेत. वाहतूक शाखेचे उपायुक्त विवेक पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, दुपारी ५ ते रात्री १० या वेळेत पुढील बदल लागू राहतील: बंद राहणारे मार्ग - रहाटणी फाटा ते शिवाजी महाराज पुतळा चौक : सर्व प्रकारच्या वाहनांना पूर्ण बंदी; पर्याय म्हणून काळेवाडी फाटा मार्ग वापरावा. कुणाल हॉटेल ते नखाते वस्ती : जड व अवजड वाहनांना प्रवेश बंद. पिंपळे सौदागर पोलीस चौकी ते रहाटणी फाटा : सर्व वाहनांसाठी बंद; पर्याय म्हणून पी. के. चौक मार्ग उपलब्ध. जीवनज्योती हॉस्पिटल (टी-पॉइंट) ते शिवाजी महाराज पुतळा चौक : दोन्ही बाजूंनी वाहतूक बंद. रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि पोलिसांची अत्यावश्यक वाहने यांना या निर्बंधातून सूट देण्यात आली आहे. कोंडी टाळण्यासाठी नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, तसेच स्थानिक पोलिसांच्या सूचनांचे आणि डिजिटल नकाशांचा वापर करून पर्यायी मार्गांचा अवलंब करावा, असे आवाहन वाहतूक विभागाने केले आहे. आंबेडकर जयंतीचा उत्साह साजरा करताना नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करून शिस्त पाळावी, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये १६ मेपासून जनगणना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात आगामी जनगणना प्रक्रियेचा पहिला टप्पा १६ मेपासून सुरू होणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने पूर्वतयारी पूर्ण केली असून, प्रशिक्षित मनुष्यबळ सज्ज करण्यात आले आहे. जनगणनेपूर्वी क्षेत्रीय प्रशिक्षकांचे (फील्ड ट्रेनर्स) प्रशिक्षण ६ ते ११ एप्रिलदरम्यान विविध केंद्रांवर पार पडले.

जनगणना प्रक्रियेचा पहिला टप्पा १६ मे ते १४ जून या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या टप्प्यात शहरातील घरांची यादी तयार केली जाणार असून, प्रत्येक १८० ते २०० घरांचा एक गट (ब्लॉक) तयार करण्यात येईल. या प्रक्रियेद्वारे प्रत्येक कुटुंबाची अचूक माहिती गोळा करून पुढील टप्प्यातील प्रत्यक्ष जनगणनेसाठी आवश्यक डेटा तयार केला जाणार आहे. जनगणना सुरळीत पार पाडण्यासाठी महापालिकेकडून सुमारे ५,५०० प्रगणक आणि पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या जनगणनेमुळे शहराच्या लोकसंख्येची, सामाजिक व आर्थिक स्थितीची अद्ययावत माहिती उपलब्ध होणार आहे. सध्याची शहराची लोकसंख्या सुमारे ३५ लाखांच्या घरात असल्याचा अंदाज असून, या प्रक्रियेमुळे नियोजन, पायाभूत सुविधा आणि शहरी विकासासाठी महत्त्वपूर्ण आधार मिळणार आहे. नागरिकांना जनगणना प्रक्रियेत सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुण्यात 'संयुक्त अभिवादन'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पुण्यात मंगळवार, १४ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता भव्य 'संयुक्त अभिवादन' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती महोत्सव समिती, पुणे' यांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून, शहरातील विविध स्तरांतील मान्यवर या सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात राज्य व केंद्र सरकारमधील मंत्री, लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर एकत्र येऊन महामानवाला अभिवादन करणार आहेत. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, डॉ. अमोल कोल्हे, पार्थ पवार आणि मेधा कुलकर्णी यांच्यासह पुण्यातील आमदार उपस्थित राहणार आहेत. पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत फुलकुंडवार, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा कार्यक्रमाला उपस्थित राहतील. याशिवाय विविध पक्षांचे शहराध्यक्ष हेही सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

# विद्यार्थ्यांनी चौकटीबाहेर जात विचार करावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता चौकटीबाहेरचा नाविन्यपूर्ण विचार करण्याची क्षमता विकसित करणे गरजेचे असून, त्यातूनच उज्ज्वल भविष्याचा मार्ग मोकळा होतो, असे प्रतिपादन रामहरी कुटे यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि 'यशस्वी' एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्यवस्थापनातील नाविन्यता आणि माहिती तंत्रज्ञान' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कुटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, एखाद्या घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोनच ती समस्या आहे की संधी, हे ठरवतो. त्यामुळे नाविन्यपूर्ण विचारसरणी, कृतीशीलता आणि सातत्य या गुणांमुळेच यश मिळते. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पना केवळ मनात न ठेवता त्या लिहून ठेवाव्यात आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे त्यांनी आवाहन केले.

'यशस्वी' संस्थेचे अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना संशोधनवृत्ती जोपासण्याचे आवाहन केले. संशोधन केवळ शोधनिबंधांपुरते मर्यादित न ठेवता ते प्रत्यक्ष समस्यांच्या निराकरणासाठी वापरणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

या परिषदेत देश-विदेशातील विविध विद्यापीठांच्या सहकार्याने १३० संशोधन प्रबंध सादर करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शोधनिबंधांच्या संक्षिप्त पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयआयएमएसचे संचालक डॉ. शिवाजी मुंढे, आयटीएस कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक केदार खळदकर तसेच देश-विदेशातील तज्ज्ञ, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंधश्रद्धेच्या नावाखाली विवाहितेचा छळ; पतीसह तिघांवर गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** पुण्यातील कात्रज परिसरात अंधश्रद्धेच्या नावाखाली एका विवाहित महिलेचा छळ केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. वास्तू सल्लागार आणि 'होलिस्टिक हिलर' यांच्या सल्ल्याने पतीने पत्नीला मानसिक व शारीरिक त्रास दिल्याचे पोलिस तपासात समोर आले असून, या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात पतीसह दोन महिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३३ वर्षीय महिलेचा विवाह २०१६ मध्ये विवेक निकम याच्यासोबत झाला होता. सुरुवातीला संसार सुरळीत होता; मात्र २०२४ नंतर पतीची ओळख एका महिला वास्तू सल्लागाराशी झाल्यानंतर परिस्थितीत बदल झाला. संबंधित महिलेने पत्नीबद्दल चुकीची माहिती देत पतीच्या मनात संशय निर्माण केला, असा आरोप आहे. त्यानंतर पतीने पत्नीचा छळ सुरू केल्याचे तक्रारीत नमूद आहे. मे २०२५ मध्ये या प्रकरणात आणखी एका 'होलिस्टिक हिलर' महिलेचा समावेश झाला. तिने पतीला 'पितृदोष' असल्याचे सांगून विविध अघोरी उपाय करण्यास भाग पाडल्याचा आरोप आहे. पत्नीवर करणी झाल्याचे सांगत तिच्याविषयी गैरसमज पसरवण्यात आले. पतीने पत्नीवर मुलगा होण्यासाठी मंत्रोपचार करण्याचा दबाव टाकला, तसेच दुसरे लग्न करण्याबाबतही धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. माहेरून पाच लाख रुपये आणण्यास सांगून मारहाण व मानसिक छळ केल्याचेही समोर आले आहे. पीडितेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी पती आणि संबंधित दोन्ही महिलांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### बनावट ईमेलद्वारे ५५ लाखांची फसवणूक

**पुणे :** भोसरी एमआयडीसी परिसरात एका कंपनीची बनावट ईमेलद्वारे तब्बल ५५ लाखांहून अधिक रकमेची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी संजय बाबूराव जाधव (वय ४०, रा. तळेगाव दाभाडे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते काम करत असलेल्या कंपनीला कच्चा माल पुरवठा करणाऱ्या चीनमधील कंपनीच्या नावाने अज्ञात आरोपीने बनावट ईमेल आयडी तयार केला. या ईमेलद्वारे कंपनीला चुकीची बँक माहिती पाठवून पैसे ट्रान्सफर करण्यास भाग पाडण्यात आले.

आरोपीने सिटीझन्स बँक (अमेरिका) येथील खात्याची माहिती देत, त्यात रक्कम जमा करण्यास सांगितले. कंपनीने दिलेल्या माहितीनुसार ५५,२५,९७४ रुपये इतकी रक्कम संबंधित खात्यावर वर्ग करण्यात आली. नंतर हा प्रकार फसवणुकीचा असल्याचे लक्षात आल्यानंतर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. याप्रकरणी अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक तळेकर करीत आहेत.

### निगडीत कोयत्याने हल्ला

**पिंपरी :** निगडी परिसरातील पीसीएमसी कॉलनी क्रमांक १ मधील सार्वजनिक शौचालयाजवळ जुन्या वादातून चार जणांनी तरुणावर कोयत्याने हल्ला केल्याची घटना शनिवारी पहाटे उघडकीस आली. या हल्ल्यात एक जण गंभीर जखमी झाला असून, त्याला वाचवण्यासाठी आलेल्या व्यक्तीलाही मारहाण करण्यात आली.

माहितीनुसार, प्रसाद नंदकुमार बहुळे (वय ३०) हे शनिवारी पहाटे सुमारे ४.५० वाजता संबंधित ठिकाणी असताना आरोपींनी त्यांना गाठले. आरोपींनी बहुळे यांना शिवीगाळ करत धमकी दिली. त्यानंतर विवेक उर्फ विक्की सोनकांबळे आणि जुबेर शेख यांनी कोयत्याने बहुळे यांच्यावर वार करून गंभीर जखमी केले.

दरम्यान, बहुळे यांना वाचवण्यासाठी धावून आलेल्या किरण काळे यांच्यावरही आरोपींनी हल्ला केला. या प्रकरणी निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दळवी करत आहेत.

# आशादीप विझला; स्वरांचा सूर्य अनंतात विलीन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** भारतीय संगीतविश्वातील अजरामर स्वरांचा एक सुवर्णअध्याय आज संपला. ज्येष्ठ व अष्टपैलू गायिका आशा भोसले यांच्या निधनाने कला, संस्कृती आणि संगीत क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

त्यांच्या जाण्याने भारतीय संगीताचा 'आशादीप' विझल्याची भावना व्यक्त होत असून, त्यांच्या स्वरांचा प्रकाश मात्र पिढ्यान्पिढ्या मार्गदर्शक ठरणार असल्याचे मत विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. यासंदर्भात आमदार अमित गोरखे (संस्थापक अध्यक्ष, कलारंग संस्था) यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना म्हटले की, "आशा भोसले या केवळ गायिका नव्हत्या, तर त्या भारतीय संगीतसंस्कृतीचा जिवंत वारसा होत्या. त्यांच्या स्वरांनी प्रेम, वेदना, आनंद आणि जीवनाचा उत्सव यांना अद्वितीय अभिव्यक्ती दिली."

ते म्हणाले, "त्यांच्या जाण्याने 'आशा'चा दीप जरी मालवला असला, तरी त्यांच्या स्वरांची प्रभा अनंत काळ प्रेरणा देत राहील. संगीताच्या प्रत्येक सूरामध्ये त्यांनी जिवंतपणा आणला आणि भारतीय संस्कृतीचे वैभव जगभर पोहोचवले. आज आपण एका युगाचा अंत अनुभवत आहोत. आशा भोसले यांच्या गायकीने असंख्य रसिकांच्या भावना, आठवणी आणि क्षणांना स्वरबद्ध केले. कलारंग संस्थेच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### स्कॉर्पिओची दुचाकीला धडक; चालक फरार

**लोणी काळभोर :** पुणे-सोलापूर महामार्गावरील लोणी काळभोर (ता. हवेली) येथील बोरकर वस्ती परिसरात स्कॉर्पिओने दुचाकीला धडक देऊन चालक फरार झाल्याची घटना घडली. या अपघातात शुभम नानासो शितोळे (वय २९, रा. दौंड) गंभीर जखमी झाले आहेत. २५ मार्च रोजी सकाळी कामावर जात असताना शितोळे हे होंडा युनिकॉर्न दुचाकीवरून प्रवास करत होते. शेल पेट्रोल पंपाजवळ स्कॉर्पिओ चालकाने कोणताही इशारा न देता अचानक यू-टर्न घेतल्याने दुचाकीची जोरदार धडक झाली. यात शितोळे यांना पाय व हाताला फ्रॅक्चर तसेच डोक्याला दुखापत झाली. अपघातानंतर चालक घटनास्थळावरून पळून गेला. स्थानिकांच्या मदतीने जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे.

CRIME NEWS

### जमिनीच्या वादातून पिकाची नासधूस

**लोणी काळभोर :** थेऊर (ता. हवेली) येथे वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वादातून ट्रॅक्टर घालून ऊस पिकाची नासधूस केल्याची आणि मारहाणीची घटना रविवारी (ता. १२) सकाळी घडली. याप्रकरणी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शरद कुंजीर, तुकाराम धोंडीबा कुंजीर व सागर उत्तम कुंजीर (रा. दळवी वस्ती, थेऊर) अशी आरोपींची नावे आहेत. फिर्यादी ओंकार कुंजीर (वय २३) यांनी तक्रार दिली आहे. गट क्रमांक ११८ मधील सुमारे तीन एकर जमिनीवरून वाद सुरू असताना आरोपींनी ट्रॅक्टरने ऊस पिकात नांगरणी केली. यात सुमारे पाऊण एकर ऊस पिकाचे नुकसान झाले. विरोध केल्यावर शिवीगाळ व मारहाण केल्याचा आरोप आहे. पोलिसांनी विविध कलमांखाली गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## उन्हाचा वाढता पारा; प्रवाशांना निवाऱ्याची गरज

# ओतूर बसस्थानकाच्या सुधारणांना मुहूर्त कधी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**ओतूर :** शिवजन्मभूमी जुन्नर तालुक्यातील ओतूर हे गाव कल्याण–अहिल्यानगर महामार्गावर असल्याने येथे प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. या महामार्गावरील महत्त्वाचे बसस्थानक असूनही प्रवासी सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. बसस्थानक उभारल्यानंतर त्यामध्ये कोणताही लक्षणीय बदल झालेला नसल्याने सध्याची बैठक व्यवस्था अपुरी पडत आहे. अनेकदा प्रवाशांना उभे राहण्यासाठीही जागा उपलब्ध नसते. या समस्येकडे संबंधित विभाग दुर्लक्ष करत असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

यंदा उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांची अक्षरशः लाही लाही होत आहे. अशा परिस्थितीत ओतूर बसस्थानकात सावलीची अपुरी व्यवस्था असल्याने प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. वाढत्या प्रवासी संख्येमुळे निवाऱ्याची गरज अधिक तीव्र झाली असून, तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. एस.टी. व परिवहन विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी आग्रही मागणी प्रवाशांकडून होत आहे.

ओतूर हे या मार्गावरील प्रमुख बसस्थानक असल्याने येथे महाराष्ट्राच्या विविध भागांतून येणाऱ्या बससेवांची मोठी वर्दळ असते. मात्र, अपुऱ्या जागेमुळे प्रवाशांना उन्हात उभे राहून वाहनांची प्रतीक्षा करावी लागत आहे. लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना विशेषतः उष्णतेचा त्रास सहन करावा लागत असून, संभाव्य दुर्घटनांचा धोका देखील निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

परभणी, बसमत, संभाजीनगर, धाराशिव, अहिल्यानगर, बीड, लातूर, जालना, मेहकर, आंबाजोगाई, तुळजापूर, श्रीरामपूर, संगमनेर, अकोले, शिर्डी, धारूर, परळी, गेवराई, बुलढाणा, भगवानगड, पिंपळनेर, अकोला (विदर्भ), पंढरपूर, पारनेर, शिरूर, पाटोदा, भूम, पैठण तसेच भिवंडी, ठाणे, कल्याण, वसई, बोरिवली, पनवेल, वाडा, अर्नाळा, मुंबई, परेल, पालघर, नालासोपारा, विठ्ठलवाडी या मार्गांवरील बसेस येथे ये-जा करतात. यामुळे राज्यभरातून प्रवाशांची मोठी गर्दी येथे होत असते. लांब पल्ल्याच्या बसेससह तालुक्यातील शटल सेवा देखील येथे कार्यरत आहे. त्यामुळे बसस्थानक अद्ययावत करणे अत्यावश्यक झाले आहे.

या संदर्भात संबंधित एस.टी. विभागाकडे वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे. जुन्नर तालुक्यातील इतर बसस्थानके सुधारली असताना ओतूर बसस्थानकाच्या कामाला अद्याप मुहूर्त लागलेला नाही, अशी खंत व्यक्त होत आहे. तांत्रिक अडचणी की अन्य कारणे, याबाबत नागरिक अनभिज्ञ आहेत. मात्र, सध्याची दुरवस्था पाहता बसस्थानकाच्या सुधारणा केव्हा होतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, या मार्गावरून सुमारे ९७ बसेसची ये-जा होत असली तरी येथे केवळ एकच वाहतूक नियंत्रक कार्यरत आहे. दिवसा सेवा देऊन रात्री अनुपस्थिती असल्याने अडचणी निर्माण होतात. त्यामुळे दिवस-रात्र अशा दोन पाळ्यांमध्ये वाहतूक नियंत्रक नेमण्याची गरज व्यक्त होत आहे. तसेच बसस्थानकात सफाई कामगाराचीही आवश्यकता असून, त्याची नेमणूक करण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

याशिवाय, ओतूर–नारायणगाव–उंब्रज या मार्गावरील फेऱ्यांसाठी केवळ एकच एस.टी. मुक्कामी आहे. पूर्वी येथे पुण्याकडे जाणारी बस उपलब्ध होती, जी विद्यार्थी, रुग्ण आणि नोकरदारांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत होती. मात्र, ही सेवा काही वर्षांपूर्वी बंद करण्यात आल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही बससेवा तातडीने पुन्हा सुरू करण्याची मागणीही नागरिकांकडून जोर धरत आहे.

# उन्हाळी भुईमूगाला पाण्याचा ताण



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात वाढत्या उष्णतेचा आणि तीव्र पाणीटंचाईचा फटका शेती पिकांना बसू लागला असून, विशेषतः उन्हाळी भुईमूग पिकावर त्याचा गंभीर परिणाम दिसून येत आहे. अनेक ठिकाणी पिके सुकण्याच्या मार्गावर असल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

पारगाव, शिंगवे, नागापूर, रांजणी, वळती, थोरांदळे, खडकी, लौकी या परिसरात शेतकरी मोठ्या प्रमाणावर उन्हाळी भुईमूगाची लागवड करतात. मात्र, दरवर्षीप्रमाणे यंदाही पाण्याच्या टंचाईमुळे या पिकाला ताण सहन करावा लागत आहे. सध्या भुईमूगाचे पीक साधारण एक ते दीड महिन्यांचे असून ते फुलोऱ्याच्या महत्त्वाच्या अवस्थेत आहे.

या निर्णायक टप्प्यावर वाढत्या उष्णतेमुळे आणि पाण्याच्या कमतरतेमुळे पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम होत आहे. अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी व बोअरवेलमधील पाणीसाठा कमी झाल्याने वेळेवर पाणी देणे कठीण झाले आहे. परिणामी, भुईमूगाच्या झाडांची वाढ खुंटत असून काही ठिकाणी पिके वाळू लागली आहेत.

शेतकऱ्यांच्या मते, फुलोऱ्याच्या काळात पिकाला पाण्याची अत्यंत गरज असते. या काळात पाणी न मिळाल्यास शेंगांची वाढ व्यवस्थित होत नाही आणि उत्पादनात मोठी घट येते. त्यामुळे यंदाच्या हंगामात अपेक्षित उत्पन्न मिळणार की नाही, याबाबत शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

# बासमती तांदळाच्या दरात उसळी

## आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** देशातील बासमती तांदळाला देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी मागणी वाढल्याने दरात लक्षणीय वाढ झाली आहे. मध्यपूर्व देशांसह परदेशातून वाढलेल्या मागणीमुळे बासमती तांदळाच्या दरात क्विंटलमागे सुमारे ४०० ते ५०० रुपयांची वाढ नोंदवली गेली आहे.

व्यापाऱ्यांच्या मते, काही भागांत गॅस तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर सहज शिजणाऱ्या अन्नपदार्थांना प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे बासमती तांदळाचा वापर वाढला आहे. याशिवाय जागतिक पातळीवरील अस्थिरतेमुळे अनेक देश अन्नधान्य साठवणुकीकडे वळले असून, त्याचा थेट परिणाम बासमतीच्या मागणीवर झाला आहे. गहू व ज्वारीच्या बाजारातही चांगल्या प्रतीच्या मालाला मागणी वाढली आहे. उच्च प्रतीच्या गव्हाच्या दरात किलोमागे १ ते १.५० रुपयांची वाढ झाली आहे. मात्र, ज्वारी व बाजरीचे दर स्थिर असून, मागील आठवड्याप्रमाणेच व्यवहार सुरू आहेत. ग्रामीण भागातून पुरवठा सुरळीत असल्याने या धान्यांच्या दरात मोठे चढ-उतार झालेले नाहीत. साखरेच्या बाजारात किंचित दिलासा मिळाला असून, दरात क्विंटलमागे २० ते २५ रुपयांची घट झाली आहे. मात्र, साखरेची निर्यात पुन्हा सुरू झाल्याने येत्या काही दिवसांत दर पुन्हा वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. मसाल्यांच्या बाजारात लाल मिरची व धने यांच्या दरात वाढ झाली आहे. लाल मिरचीच्या दरात किलोमागे ५ ते १० रुपयांची वाढ झाली असून, अवकाळी पावसामुळे उत्पादनावर परिणाम झाल्याने धनेदरात सलग दुसऱ्या आठवड्यात वाढ नोंदवली गेली आहे. धनेदरात किलोमागे १० ते १५ रुपयांची वाढ झाली आहे. गोटा खोबऱ्याच्या दरात सर्वाधिक वाढ दिसून आली आहे. हवामानातील बदल, साठवणुकीतील नुकसान आणि दर्जा खालावल्याने पुरवठा घटला असून, दरात किलोमागे सुमारे ४० रुपयांची वाढ झाली आहे.

दरम्यान, शेंगदाणे, खाद्यतेल, विविध डाळी, कडधान्ये, साबुदाणा, भगर आणि नारळ यांच्या दरात स्थिरता कायम आहे. पुरवठा सुरळीत असल्याने या वस्तूंच्या किमतीत मोठा बदल झालेला नसल्याचे व्यापाऱ्यांनी स्पष्ट केले.

# पिंपळवंडीत बैलगाडा शर्यतींचा थरार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे ग्रामदैवत श्री मळगंगामातेच्या यात्रोत्सवानिमित्त आयोजित दोन दिवसीय बैलगाडा शर्यतींना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या या शर्यतींमध्ये चांगलाच थरार पाहायला मिळाला. ओतूर येथील 'हॉटेल ब्ल्यू डायमंड'चे गिलबीले बंधू यांचा बैलगाडा यंदाचा 'घाटाचा महाराजा' ठरला.

यात्रोत्सवानिमित्त अभिषेक, मांडव-डहाळे, चोळीपातळ, छबिना मिरवणूक, ऑर्केस्ट्रा, लोकनाट्य तसेच कुस्त्यांचा जंगी आखाडा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात बैलगाडा शर्यती हे प्रमुख आकर्षण ठरले.

शर्यतीचे उद्घाटन जुन्नरचे आमदार शरद सोनवणे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष शरद लेंडे, जिल्हा परिषद सदस्य मंगेश काकडे, सरपंच मेघाताई काकडे, पंचायत समिती सदस्य जयसिंग पोटे, रघुनाथ लेंडे यांच्यासह यात्रा समितीचे अध्यक्ष विवेक काकडे, बैलगाडा समितीचे अध्यक्ष दत्तात्रय टाकळकर, कार्याध्यक्ष बबन दांगट, उपाध्यक्ष सचिन वामन, मयूर वामन, माजी सचिव प्रदीप लेंडे, अक्षय फुलसुंदर, खजिनदार किशोर शेटे, मयुरेश काचळे यांच्या उपस्थितीत झाले. दोन दिवस चाललेल्या या शर्यतींमध्ये मोठ्या संख्येने बैलगाड्यांचा सहभाग होता. पहिल्या क्रमांकासाठी ६२, दुसऱ्या क्रमांकासाठी १०१ तर तिसऱ्या क्रमांकासाठी ४८ बैलगाड्यांनी स्पर्धा केली. अंतिम फेरीत पहिल्या पाच क्रमांकांसाठी एकूण २० बैलगाडे धावले. विजेत्यांना रोख बक्षिसे देण्यात आली.

यात्रेदरम्यान बक्षीस देणाऱ्या मान्यवरांचाही सत्कार करण्यात आला. सलग तीन वर्षांनंतर पुन्हा रंगलेल्या या बैलगाडा शर्यती पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

# ग्रामीण भागात आयपीएलचा ज्वर
## उन्हाच्या कडाक्यातही क्रिकेटप्रेम कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यासह ग्रामीण भागात सध्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेट स्पर्धेचा उत्साह शिगेला पोहोचला असून, त्याचा प्रभाव गावागावात स्पष्टपणे दिसू लागला आहे. शहरांप्रमाणेच ग्रामीण भागातील क्रिकेटप्रेमींमध्येही या स्पर्धेबाबत मोठी उत्सुकता असून, लहान मुलांपासून तरुणांपर्यंत सर्वजण आयपीएलचा आनंद घेत आहेत.

दरम्यान, उन्हाळ्याचा कडाका दिवसेंदिवस वाढत असतानाही मुलांचे क्रिकेटप्रेम कमी झालेले नाही. शाळा सकाळच्या वेळेत भरत असल्याने विद्यार्थी अकरा-बारा वाजेपर्यंत घरी परततात. त्यानंतर मिळणाऱ्या मोकळ्या वेळात ते थेट मैदान, मोकळी माळराने किंवा शेत गाठत क्रिकेट खेळण्यात रममाण होत आहेत.

गेल्या काही वर्षांत आयपीएल स्पर्धेमुळे क्रिकेटला नवी ओळख मिळाली आहे.

या स्पर्धेमुळे मुलांमध्ये क्रिकेटविषयी आकर्षण वाढले असून, अनेक मुले आपल्या आवडत्या खेळाडूंची शैली आत्मसात करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. संध्याकाळच्या वेळी घराघरांत टीव्हीसमोर आयपीएल सामने पाहण्यासाठीही मोठी गर्दी होत आहे.

ग्रामीण भागातील मुलांकडे आधुनिक क्रिकेट साहित्य नसले तरी त्यांच्या उत्साहात कुठलीही कमतरता नाही. अनेक ठिकाणी जुने टायर स्टम्प म्हणून वापरले जातात, तर फळीपासून बनवलेली बॅट आणि टेनिस बॉलच्या साहाय्याने सामने रंगवले जातात. साधनसामग्रीची मर्यादा असूनही खेळाविषयीची त्यांची आवड आणि जिद्द विशेष ठरते.

# ओतूरमध्ये महात्मा फुले यांना अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**ओतूर :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी ५ डिसेंबर १८४८ रोजी सुरू केलेल्या ओतूर येथील मुलींच्या प्राथमिक शाळा (क्रमांक १) येथे त्यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शिक्षक व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महात्मा फुले यांना अभिवादन केले.

कार्यक्रमात "सत्यशोधक" चित्रपटाचे निर्माते अप्पा बोराटे, प्राचार्य डॉ. चंद्रकांत मंडलिक, सामाजिक कार्यकर्ते रमेश बोराटे, मुख्याध्यापक रवींद्र डुंबरे, ॲड. जयदीप डुंबरे आणि शरद ताजने यांनी महात्मा फुले तसेच शाळा सुरू करण्यासाठी सहकार्य करणारे कै. भाऊ डुंबरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. चंद्रकांत मंडलिक यांनी आपल्या भाषणात महात्मा फुले यांच्या समतेच्या विचारांचा समाजात प्रसार होणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांनी शेती, व्यवसाय आणि अर्थकारणाबाबत फुले यांनी घालून दिलेल्या आदर्शाचा उल्लेख करत स्त्री शिक्षणाच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अप्पा बोराटे यांनी महात्मा फुले यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा आढावा घेत त्यांच्या जीवनावर चित्रपट निर्मितीचे स्वप्न पूर्ण झाल्याचा आनंद व्यक्त केला. दोनशे वर्षांपूर्वी उभारलेली शाळेची इमारत आजही सुस्थितीत असल्याचे पाहून समाधान वाटत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, महात्मा फुले यांनी सर्व समाजघटकांसाठी शिक्षण आणि सामाजिक एकतेचे कार्य केले, असेही त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी विद्यार्थिनींचे वाढदिवस पेढे व नाश्ता देऊन साजरे करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक रवींद्र डुंबरे, प्रमोद बोडके व महिला शिक्षकांनी केले. शिक्षिका संगीता हिले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## अपेक्षित दर नसल्याने साठवणुकीकडे शेतकऱ्यांचा कल

# आंबेगाव तालुक्यात कांदा बराकी, चाळी फुल्ल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात रब्बी हंगामातील कांदा काढणीची कामे अंतिम टप्प्यात आली असून, समाधानकारक बाजारभाव मिळत नसल्याने यावर्षीही कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी साठवणुकीचा पर्याय स्वीकारला आहे. त्यामुळे तालुक्याच्या पूर्व भागातील बहुतांश गावांमध्ये कांद्याच्या बराकी व चाळी पूर्णपणे भरल्याचे चित्र दिसून येत आहे.

यंदा कांद्याला अपेक्षित दर न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरात वाढ होण्याच्या अपेक्षेने अनेक शेतकरी आपला कांदा तात्काळ विक्री न करता साठवून ठेवत आहेत. यासाठी पारंपरिक चाळींबरोबरच लोखंडी जाळीच्या आधुनिक बराक्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. अलीकडेच तालुक्याच्या पूर्व भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. या पावसामुळे शेतात उघड्यावर ठेवलेला कांदा भिजून काही प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे उर्वरित कांद्याचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांनी तातडीने साठवणुकीकडे वळण्याचा निर्णय घेतला. परिणामी, सध्या सर्वच ठिकाणी कांदा साठवणूक केंद्रे, म्हणजेच बराकी आणि चाळी, कांद्याने फुल्ल झालेल्या दिसत आहेत. योग्य बाजारभाव मिळेपर्यंत कांदा सुरक्षित राहावा यासाठी शेतकरी उपाययोजना करत असून, कोरडे वातावरण आणि सुरक्षित साठवणुकीवर भर दिला जात आहे.

# धामणी खिंडीत डोंगराला आग; वनसंपदेचे मोठे नुकसान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील डोंगररांगांमध्ये अज्ञात व्यक्तींमार्फत वणवे लावण्याच्या घटना वाढत असून, यामुळे निसर्गसंपदेचे मोठे नुकसान होत आहे. अशाच प्रकारे धामणी खिंड परिसरातील डोंगराला सोमवारी दुपारी आग लागल्याची घटना घडली.

धामणी येथील धामणी खिंड–ज्ञानेश्वर मंदिरासमोरील डोंगर परिसरात दुपारी एक ते दोन वाजण्याच्या सुमारास ही आग लागली. रस्त्यालगत असलेल्या डोंगरावर अचानक पेटलेल्या आगीमुळे परिसरात खळबळ उडाली. ही आग अज्ञात व्यक्तींनी लावल्याचा संशय स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे. या वणव्यामुळे वनसंपदा, विविध पक्षी, प्राणी, औषधी वनस्पती तसेच सरपटणारे जीव मोठ्या प्रमाणावर आगीच्या भक्षस्थानी पडल्याने पर्यावरणाचे मोठे नुकसान झाले आहे. अशा प्रकारे वणवे लावणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी निसर्गप्रेमी व स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे. वन विभागानेही अशा घटनांची माहिती देण्याचे आवाहन केले असून, माहिती देणाऱ्यांची नावे गोपनीय ठेवली जातील, असे स्पष्ट केले आहे. तसेच दोषींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.

## सारांश वृत्त

### रस्ते अपघातांमध्ये चार जणांचा मृत्यू

**हैदराबाद:** तेलंगणातील विकाराबाद जिल्ह्यात सोमवारी रस्ते अपघातांमध्ये एकाच कुटुंबातील तीन सदस्यांसह चार जणांचा मृत्यू झाला. पेद्देमूल मंडळात पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास समोरून येणाऱ्या लॉरीने दुचाकीला धडक दिल्याने एका जोडप्याचा आणि त्यांच्या मुलीचा मृत्यू झाला, तर त्यांचा मुलगा किरकोळ जखमी झाला.

### जनगणनेसाठी कर्मचारी तैनात

**रायपूर** : छत्तीसगडमध्ये १ मे ते पुढील वर्षी फेब्रुवारी दरम्यान दोन टप्प्यांत घेण्यात येणाऱ्या २०२७ च्या जनगणनेसाठी ६२,००० हून अधिक कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. येथे आयोजित पत्रकार परिषदेत राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) मनोज कुमार पिंगुआ म्हणाले की, घरांची यादी आणि गृहगणना यांचा समावेश असलेला पहिला टप्पा यावर्षी १ मे ते ३० मे दरम्यान पार पडेल, तर लोकसंख्या गणनेशी संबंधित दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२७ मध्ये पार पडेल. देशात प्रथमच आगामी जनगणना डिजिटल पद्धतीने घेतली जाईल आणि त्यात ऐच्छिक स्वयं-नोंदणीची सुविधाही उपलब्ध असेल, असे पिंगुआ म्हणाले.

### केरळ: मासेमारीच्या बोटीला आग



**कोल्लम (केरळ)** : येथे एका यार्डात नांगरलेल्या मासेमारीच्या बोटीला सोमवारी आग लागली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. अग्निशमन आणि बचाव सेवेच्या कर्मचाऱ्यांनुसार, ही घटना एका यार्डमध्ये घडली, जिथे एका मासेमारीच्या बोटीचे तुकडे केले जात होते. दुपारच्या सुमारास, पाच कामगार बोटीचे भाग वेगळे करण्याच्या कामात गुंतले असताना, बोटीला अचानक आग लागली.

## अमेरिकेचा नाकेबंदीचा दावा, इराणचा पलटवाराचा इशारा

# होर्मुझ सामुद्रधुनीवर प्रत्यक्ष तणावात वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** होर्मुझ सामुद्रधुनी परिसरात तणाव तीव्र झाला असून, डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरोधात नौदल नाकेबंदीचे आदेश दिल्यानंतर परिस्थिती अधिक चिघळली आहे. शस्त्रसंधी चर्चेत अपयश आल्यानंतर अमेरिकेच्या या निर्णयाला प्रत्युत्तर म्हणून इराण ने पर्शियन आखात आणि ओमानच्या आखातातील बंदरांवर हल्ल्याची धमकी दिली आहे.

इराणच्या लष्कराने "या प्रदेशातील कोणतेही बंदर सुरक्षित राहणार नाही," असा इशारा देत कडक भूमिका घेतली. दुसरीकडे, अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने नाकेबंदी लागू करण्याची घोषणा करत इराणी बंदरांमध्ये ये-जा करणाऱ्या जहाजांवर निर्बंध लागू केले आहेत. मात्र, इतर देशांच्या बंदरांदरम्यान जाणाऱ्या जहाजांना मर्यादित मार्गाने जाण्याची परवानगी दिली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

या घडामोडींमुळे जागतिक सागरी वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून, युद्धविरामानंतर पुन्हा सुरू झालेली जहाजांची हालचाल ठप्प झाली आहे. पूर्वी दररोज १०० ते १३५ जहाजांची वर्दळ असणाऱ्या या मार्गावर आता केवळ मर्यादित जहाजेच प्रवास करत आहेत.

दरम्यान, पाकिस्तानमध्ये झालेल्या अमेरिका-इराण चर्चेला कोणताही तोडगा न निघाल्याने तणाव वाढला आहे. इराणने युद्धामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई आणि गोठवलेली मालमत्ता परत देण्याची मागणी केली, तर अमेरिकेने अण्वस्त्र कार्यक्रम थांबवण्याची अट घातली. इराणचे वरिष्ठ नेते मोहसेन रझाई आणि मोहम्मद बागेर कलिबाफ यांनी "तुम्ही लढलात, तर आम्हीही लढू" असा इशारा देत कठोर भूमिका घेतली आहे.

या तणावाचा जागतिक अर्थव्यवस्थेवरही परिणाम दिसून येत असून, कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. यूएस क्रूड ८ टक्क्यांनी वाढून १०४ डॉलर प्रति बॅरल, तर ब्रेंट क्रूड ७ टक्क्यांनी वाढून १०२ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले आहे. कीर स्टारमर यांनी ब्रिटन या संघर्षात सहभागी होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

शस्त्रसंधी अपयशी ठरल्यानंतर होर्मुझ सामुद्रधुनीतील तणाव पुन्हा वाढला असून, जागतिक ऊर्जा पुरवठा आणि सुरक्षिततेसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

## मालदा प्रकरणी दोन काँग्रेस नेत्यांना अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मालदा जिल्ह्यातील कालियाचक परिसरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली असून, न्यायालयीन अधिकाऱ्यांच्या घेराव प्रकरणी एनआयएने काँग्रेसच्या दोन स्थानिक नेत्यांना अटक केली आहे.

१ एप्रिल रोजी विशेष सघन पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेत मतदारांची नावे वगळल्याच्या निषेधार्थ आंदोलन झाले होते. या आंदोलनादरम्यान सात न्यायिक अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणी शाहदत हुसैन आणि आसिफ शेख यांना एनआयएने अटक केली.

यापूर्वी या घटनेत इंडियन सेक्युलर फ्रंटच्या एका उमेदवारासह काही जणांना अटक करण्यात आली होती. तसेच मोथाबारी मतदारसंघातील काँग्रेस उमेदवार सायन चौधरी यांनाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले होते. मात्र, दीर्घ चौकशीनंतर त्यांना सोडून देण्यात आले. चौधरी यांनी ही कारवाई राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप केला आहे.

पश्चिम बंगाल सीआयडीने या प्रकरणातील कथित सूत्रधार वकील मोफक्करुल इस्लाम याला बागडोगरा विमानतळावरून अटक केली. तो बंगळूरला पळून जाण्याच्या प्रयत्नात असल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनांमुळे राज्यातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी वरिष्ठ प्रशासकीय व पोलीस अधिकाऱ्यांसोबत तातडीची बैठक घेतली.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया देत तृणमूल काँग्रेसवर निशाणा साधला. न्यायिक अधिकाऱ्यांना घेराव घालणे ही केवळ अराजकता नसून "जंगलराज" असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच एसआयआर प्रक्रियेत सहभागी अधिकाऱ्यांवर हल्ले होणे म्हणजे संविधानावर आघात असल्याचेही त्यांनी म्हटले.

## राज्यसभा उपसभापतीपदी पुन्हा हरिवंश?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : हरिवंश यांच्या कार्यकाळानंतर राज्यसभेच्या उपसभापतीपदासाठी त्यांची पुन्हा निवड करण्यासाठी सत्ताधारी एनडीएने हालचाली सुरू केल्या आहेत. यासाठी जेपी नड्डा यांनी विविध पक्षांच्या नेत्यांशी संपर्क साधून व्यापक सहमती मिळवण्याचा प्रयत्न केला असल्याचे समजते.

या घडामोडींवर विरोधकांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. २०१९ पासून रिक्त असलेल्या लोकसभेच्या उपसभापती पदाकडे दुर्लक्ष करून राज्यसभेच्या पदासाठी दाखवली जाणारी घाई संशयास्पद असल्याचा आरोप काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि डाव्या पक्षांनी केला आहे.

अधिकृत अधिसूचना अद्याप जाहीर झालेली नसली तरी, १६ किंवा १७ एप्रिल रोजी विशेष अधिवेशनादरम्यान ही निवडणूक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महिला आरक्षण विधेयकाच्या दुरुस्तींसाठी संसद अधिवेशन बोलावले जाण्याची शक्यता आहे. जयराम रमेश यांनी सरकारवर टीका करत, "जे सरकार सात वर्षे लोकसभेचे उपसभापती नियुक्त करू शकत नाही, ते राज्यसभेच्या पदासाठी घाई करत आहे," असे म्हटले. डेरेक ओ'ब्रायन यांनीही १७ एप्रिलला निवडणूक घेण्याच्या प्रस्तावावर प्रश्न उपस्थित करत, "संसदेची खिल्ली उडवली जात आहे," असा आरोप केला. खासदार राज्यांतील निवडणुकांमध्ये व्यस्त असताना ही घाई का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. पी. संदोश यांनी लोकसभेच्या उपसभापतीपदासाठीही अशीच तत्परता दाखवावी, अशी मागणी केली. ९ एप्रिल रोजी हरिवंश यांचा कार्यकाळ संपल्यानंतर हे पद रिक्त झाले. त्यानंतर द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना राज्यसभेवर नामनिर्देशित केले आणि त्यांनी १० एप्रिल रोजी शपथ घेतली. हरिवंश यांनी यापूर्वी दोन वेळा राज्यसभेचे उपसभापती म्हणून काम पाहिले आहे.

## बंगालमध्ये राजकीय आरोप-प्रत्यारोपांना उधाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता** : पश्चिम बंगालमधील निवडणूक प्रचार आता निर्णायक टप्प्यात पोहोचला असून सत्ताधारी ममता बॅनर्जी आणि भाजप यांच्यातील वाद अधिक तीव्र झाला आहे. बीरभूम जिल्ह्यातील सुरी येथे सभेत बोलताना बॅनर्जी यांनी आपण जनतेच्या हितासाठी एकहाती लढत असल्याचा दावा केला, तसेच त्यांना पराभूत करण्यासाठी केंद्र सरकारसह एनडीए शासित १९ राज्यांना एकत्र यावे लागेल, असे विधान केले.

त्यांनी भाजपवर गंभीर आरोप करत म्हटले की, 'दिल्ली फोर्सेस'चा वापर करून निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न होत आहे. तसेच पैशांचे वितरण, मतदारांची तस्करी आणि बाहेरील मतदारांना आणण्याचा आरोपही त्यांनी केला. २३ आणि २९ एप्रिलला होणाऱ्या दोन टप्प्यांतील निवडणुकांत तृणमूल काँग्रेस २२६ पेक्षा अधिक जागा जिंकेल, असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व २९४ मतदारसंघांमध्ये आपणच उमेदवार असल्याचे विधान केल्यावर बॅनर्जी यांनी टोला लगावला. "मोदींना पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री व्हायचे आहे का?" असा सवाल करत त्यांनी आधी देश की राज्य याचा निर्णय घ्यावा, असे आव्हान दिले.

रोजगाराच्या मुद्द्यावरही त्यांनी मोदी सरकारवर टीका केली. दोन कोटी नोकऱ्यांच्या आश्वासनाचे काय झाले, असा प्रश्न उपस्थित करत केंद्र सरकारवर दिशाभूल केल्याचा आरोप केला. 'मन की बात' कार्यक्रमावरही त्यांनी टीका करत तो तरुणांवर प्रभाव टाकण्यासाठी वापरला जात असल्याचे म्हटले.

याच पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केलेल्या 'बुलडोझर' संदर्भातील वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना बॅनर्जी म्हणाल्या की, "आम्ही बुलडोझर नव्हे, तर प्रेमाच्या धोरणावर विश्वास ठेवतो."

दुसरीकडे, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बीरभूममधील सभेत भाजपच्या 'डबल-इंजिन' सरकारचा दावा करत पश्चिम बंगालमध्ये सत्तांतर होईल, असा विश्वास व्यक्त केला.

आरोप-प्रत्यारोप, दावे आणि प्रतिदावे यांच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालची निवडणूक अत्यंत चुरशीची होत असून, आगामी निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

## लालू प्रसाद यादव यांना दिलासा नाहीच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : लालू प्रसाद यादव यांना नोकरीच्या बदल्यात जमीन प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. न्यायालयाने सोमवारी केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) यांनी दाखल केलेली एफआयआर रद्द करण्यास स्पष्ट नकार दिला. मात्र, त्याचवेळी न्यायालयाने ७७ वर्षीय यादव यांना सत्र न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहण्यापासून तात्पुरती सूट दिली आहे.

न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती एन. कोटेश्वर सिंह यांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १७ ए च्या लागूतेचा मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी यादव यांना दिली. यापूर्वीही सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणातील खटल्याच्या कार्यवाहीला स्थगिती देण्यास नकार दिला होता.

हे प्रकरण २००४ ते २००९ या कालावधीत यादव रेल्वेमंत्री असताना घडल्याचा आरोप आहे. सीबीआयनुसार, रेल्वेतील गट 'डी' पदांवर भरती करताना उमेदवारांकडून त्यांच्या कुटुंबीयांच्या नावावर जमीन हस्तांतरित करून घेण्यात आली. या नियुक्त्या कोणतीही अधिकृत जाहिरात न देता केल्याचे तपासात समोर आले आहे. १८ मे २०२२ रोजी सीबीआयने या प्रकरणी गुन्हा दाखल केला. तपासादरम्यान दिल्ली, बिहारसह अनेक ठिकाणी छापे टाकण्यात आले.

त्यानंतर यादव, त्यांच्या कुटुंबीयांसह एकूण ७७ जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले. दिल्ली उच्च न्यायालयानेही यापूर्वी यादव यांची याचिका फेटाळून खटल्याला स्थगिती देण्यास नकार दिला होता. त्या निर्णयाला आव्हान देत यादव यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

## पश्चिम बंगाल मतदार यादी

# सर्वोच्च न्यायालयाचा हस्तक्षेपास नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीतून नावे वगळण्याच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी महत्त्वाचा निर्णय दिला. विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेनंतर नावे वगळलेल्या मतदारांनी दाखल केलेली याचिका न्यायालयाने "अकाली" ठरवत ऐकून घेण्यास नकार दिला.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने स्पष्ट केले की, याचिकाकर्त्यांनी आधीच अपीलीय न्यायाधिकरणांकडे दाद मागितली असल्याने थेट सर्वोच्च न्यायालयात येणे योग्य नाही. त्यामुळे त्यांनी प्रथम उपलब्ध कायदेशीर उपायांचा पूर्ण वापर करावा, असे निर्देश देण्यात आले. न्यायालयाने याचिकेच्या गुणवत्तेबाबत कोणतेही मत व्यक्त केलेले नाही.

या प्रकरणात विशेष सखोल पुनरीक्षणानंतर सुमारे ९० लाख मतदारांची नावे वगळल्याचा दावा करण्यात आला असून, जवळपास ३४ लाख अपील विविध न्यायाधिकरणांसमोर प्रलंबित आहेत. या पार्श्वभूमीवर कलकत्ता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांनी माजी न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली १९ अपीलीय न्यायाधिकरणे स्थापन केली आहेत. याचिकाकर्त्यांनी निवडणूक आयोगावर योग्य प्रक्रिया न पाळता सरसकट नावे वगळल्याचा आरोप केला. तसेच अपीलांवर वेळेत सुनावणी होत नसल्याने मतदारांना मतदानाच्या हक्कापासून वंचित राहावे लागू शकते, अशी भीती व्यक्त केली.

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी मतदानाचा हक्क हा केवळ घटनात्मक अधिकार नसून लोकशाहीचा "भावनिक आधार" असल्याचे नमूद केले. मात्र, न्यायाधिकरणांवर ठराविक कालमर्यादेचा अतिरिक्त दबाव टाकणे शक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की, निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करणे हा अंतिम पर्याय असतो आणि त्याचा उद्देश निवडणुका थांबवणे नसून सुलभ करणे हा आहे. मोठ्या प्रमाणावर परिणाम दिसून येत नाही तोपर्यंत निवडणुकीत हस्तक्षेप केला जाणार नाही, असेही खंडपीठाने नमूद केले.

दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका २३ आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यांत पार पडणार असून, ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे.

## ९० दिवसांसाठी पुरेसा कोळसा

**हैदराबाद** : केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांनी सोमवारी सांगितले की, देशात ९० दिवसांसाठी पुरेसा २०० दशलक्ष टनांहून अधिक कोळशाचा साठा उपलब्ध आहे. येथे खाण मंत्रालयाने महत्त्वपूर्ण खनिज पट्ट्यांच्या ७ व्या टप्प्याच्या लिलावावर आणि टप्पा-२ अन्वेषण परवान्यावर आयोजित केलेल्या रोडशोच्या निमित्ताने बोलताना ते म्हणाले की, देशात आज औष्णिक वीज प्रकल्पांमध्ये किंवा खाणकाम होणाऱ्या खाणींच्या तोंडाशी ९० दिवसांसाठी पुरेसा कोळसा उपलब्ध आहे.

## सात वर्षांनंतर इराणी तेलाची भारतात एंट्री

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताच्या ऊर्जा क्षेत्रात महत्त्वाची हालचाल घडत असून, जवळपास सात वर्षांनंतर इराणचे कच्चे तेल घेऊन दोन सुपरटँकर भारतीय किनाऱ्यावर दाखल झाले आहेत. ही तेलवाहतूक अमेरिका-इराण तणावाच्या पार्श्वभूमीवर तात्पुरत्या निर्बंध सवलतीमुळे शक्य झाली आहे.

नॅशनल इराणियन टँकर कंपनीचे 'फेलिसिटी' हे अतिविशाल तेलवाहू जहाज सुमारे २० लाख बॅरल कच्चे तेल घेऊन गुजरातमधील सिक्का बंदर येथे रविवारी उशिरा पोहोचले. हे तेल मार्चच्या मध्यात खारग बेट येथून भरले गेले होते. त्याचवेळी 'जया' नावाचे दुसरे जहाज ओडिशातील पारादीप बंदर जवळ नांगरले. या जहाजाने फेब्रुवारी अखेरीस, मध्यपूर्वेतील संघर्ष तीव्र होण्यापूर्वी तेल उचलले होते.

अमेरिकेने गेल्या महिन्यात काही मर्यादित सवलती दिल्या, ज्यामुळे आधीच मार्गात असलेल्या इराणी तेलाच्या खेपांना विक्रीची परवानगी मिळाली. या निर्णयामागे वाढत्या भू-राजकीय तणावामुळे अस्थिर झालेल्या जागतिक तेलपुरवठ्याला स्थिर ठेवण्याचा उद्देश होता. मात्र, शांतता चर्चेत अपयश आल्याने आणि अमेरिकेने इराणच्या बंदरांवर नाकेबंदी जाहीर केल्याने पुन्हा अनिश्चितता वाढली आहे. पारादीप बंदर प्रामुख्याने इंडियन ऑईल कॉर्पोरेशन द्वारे चालवले जाते. या कंपनीने सवलतीअंतर्गत किमान एक खेप खरेदी केल्याची पुष्टी केली आहे. तर सिक्का बंदर हे रिलायन्स इंडस्ट्रिज आणि भारत पेट्रोलियम साठी महत्त्वाचे केंद्र आहे. मे २०१९ मध्ये अमेरिकेने निर्बंध कडक केल्यानंतर भारताने इराणकडून तेल आयात थांबवली होती. त्यापूर्वी भारत हा इराणचा प्रमुख ग्राहक होता. भारताच्या आयातीत इराणी तेलाचा वाटा ११.५% इतका होता. २०१८ मध्ये सुमारे ५.१८ लाख बॅरल प्रतिदिन इतकी आयात होती. २०१९ मध्ये त्यात घट झाली आणि तो २.६८ लाख बॅरल प्रतिदिन इतका झाला.

अमेरिकन सवलत १९ एप्रिलपर्यंत वैध आहे. सध्या सुमारे ९५ दशलक्ष बॅरल इराणी तेल समुद्रात आहे. यातील काही भाग भारताकडे वळण्याची शक्यता असली, तरी मोठा हिस्सा चीन आणि आग्नेय आशियाकडे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## वेतनवाढीच्या मागणीवरून हिंसक आंदोलन



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नोएडा** : वेतनवाढीच्या मागणीसाठी कारखान्यातील कामगारांनी सुरू केलेल्या आंदोलनाला सोमवारी काही भागांत हिंसक वळण लागले. फेज-२ आणि सेक्टर ६० परिसरात जाळपोळ, तोडफोड व दगडफेकीच्या घटना घडल्या.

विविध औद्योगिक युनिट्समधील हजाराहून अधिक कामगार मागण्यांसाठी एकत्र जमले होते. आंदोलनादरम्यान काहींनी मालमत्तेची तोडफोड करत एक वाहन पेटवून दिल्याचा आरोप आहे. त्यामुळे वाहतूक विस्कळीत होऊन नागरिकांना त्रास सहन करावा लागला. मदरसनसह काही कंपन्यांबाहेर मोठ्या प्रमाणात कामगार जमले होते. सेक्टर १, १५ व ६२ येथे रस्ते रोखण्यात आल्याने कोंडी झाली.

प्रशासनाने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला असून परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगितले. हिंसाचारात सहभागी व्यक्तींची ओळख पटवून कठोर कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले.

## वर्षाअखेरीस कराराची शक्यता; तेजसच्या निर्मितीला लाभणार वेग

# भारतात एफ-४१४ जेट इंजिन सह-उत्पादनाचा मार्ग मोकळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : जीई एरोस्पेस आणि हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) यांच्यात एफ४१४ लढाऊ जेट इंजिनच्या भारतातील सह-उत्पादनासाठी तांत्रिक चर्चा पूर्ण झाली असून, त्यामुळे वर्षाअखेरीस अंतिम करारावर स्वाक्षरी होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या करारामुळे अमेरिकेकडून भारताला प्रगत लष्करी एरो-इंजिन तंत्रज्ञानाचे मोठ्या प्रमाणावर हस्तांतरण होणार असून, लढाऊ विमानांच्या इंजिनचे देशांतर्गत उत्पादन शक्य होणार आहे.

जून २०२३ मध्ये मंजूर झालेल्या या प्रकल्पांतर्गत तेजस एमके-२ साठी आवश्यक असलेल्या एफ-४१४ इंजिन तंत्रज्ञानाचा मोठा हिस्सा भारताला मिळणार आहे. सध्या हा प्रकल्प व्यावसायिक वाटाघाटींच्या टप्प्यात असून, करारानंतर सुमारे दोन वर्षांत उत्पादन सुरू होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. याचबरोबर, तेजस एमके-१ए ताफ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या एफ-४०४ इंजिनांच्या देखभाल, दुरुस्ती व ओव्हरहॉलसाठी भारतातच सुविधा उभारण्यात येणार आहे. ही सुविधा भारतीय वायुदल चालवणार असून, जीईकडून तांत्रिक सहाय्य दिले जाणार आहे. त्यामुळे परदेशातील दुरुस्तीवरील अवलंबित्व कमी होऊन वेळ व खर्चात बचत होणार आहे.

एफ-४१४ इंजिन हे भारताच्या पुढील पिढीतील लढाऊ विमान प्रकल्पांचे मुख्य आधार मानले जात आहे. तेजस एमके-२ साठी सुमारे १२० विमानांची गरज अपेक्षित असून, एएमसीए प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात सुमारे ४० विमानांसाठीही याच इंजिनचा वापर होणार आहे. त्यामुळे एकूण १७० ते १८० इंजिनांची मागणी निर्माण होण्याची शक्यता आहे. याशिवाय, भविष्यात अधिक शक्तिशाली इंजिन विकसित करण्यासाठी भारत सॅफ्रान सोबतही चर्चा करत आहे.

दरम्यान, तेजस एमके-१ए साठी लागणाऱ्या एफ-४०४ इंजिनांच्या पुरवठ्यात विलंब झाल्याने उत्पादन प्रक्रियेला फटका बसला आहे. एचएएलला ८३ विमानांचा पुरवठा करण्याचे कंत्राट असून, पुढील ऑर्डरनंतर ही संख्या १८० पर्यंत जाण्याची शक्यता आहे. मात्र, आतापर्यंत केवळ ६ इंजिनांचा पुरवठा झाल्याने अनेक विमाने प्रतीक्षेत आहेत.

या विलंबामागे पश्चिम आशियातील तणाव, जागतिक पुरवठा साखळीतील अडथळे आणि महामारीनंतरचे परिणाम ही कारणे असल्याचे जीईकडून सांगण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर एफ-४१४ सह-उत्पादन करार भारताच्या संरक्षण स्वावलंबनासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे मानले जात आहे.